## इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ~~४३५१~~ वे १५५७ (४१२)

ग्रंथ नाम वाक्य सुधा.

विषय सं. वेदांत

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai "

वेदांत

क्र.नं. 39

# मराठी

जगन्नाथकृत वाक्यसुधा गद्य मराठी.

838 वे: ~~१०६५~~ १५५

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(1)

॥अथवाक्यसुधाप्रारंभः॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(२)

वाक्य सुधा
१

श्रीगणेशायनमः॥ओम्॥ ऋषीश्वरकृपापांगलवसंस्पर्शनेनयै॥का
चित्प्रस्फुरिताबुद्धिर्वेदांतार्थावगाहने॥१॥श्रीमदृषीश्वरपदरजें त्हतिमि
रसमूलउच्छिजविवेकांकुरें उद्भविजेमनोभूमिद्यासाची॥१॥विशेषहाटग
दृश्यविवेक॥जेथें मुमुक्षुजन सम्यक त्य होतीहा येक॥निश्चय केला
गुरुवरें।२॥प्रत्यक्षअनुभवाचा रवि॥साध्यसाधनीतिमिर नुरवि॥तो हा ग्रं
थ विवेकचि भवी॥सुमनसा सांडि दे॥३॥दृश्याशि मिथ्या दाउनी॥दृगातें स
त्यत्व प्रतिपादुनी॥तें दृग आत्मा म्हणोनी॥ग्रंथावलोकें जाणिजे॥४॥दृश्य तें
असे कैसें॥दृगनें कोण सारिखें॥तें ह्र लक्षण सम्यक॥विवरीजेतिये ग्रंथी॥५॥
दृश्य तितकें अनात्मा जाण॥दृग तो आत्मा सनातन॥त्याचा निवाडा सूक्ष्म म
नें॥ग्रंथावलोक नें करावा॥६॥जेणें आपणचि ब्रह्म हें कळे॥अज्ञानांधका

सांब
१

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(2A)

रविवक्षे॥ आत्मा घेइ जे करन वक्षे॥ तो हा ग्रंथ रचना सिद्ध॥ १॥ श्लोक॥ रूपं दृश्यं लो
चनं दृक् दृक् तद्दृश्यं दृक् च मानसं॥ दृश्याधी वृत्तयः साक्षी दृगेव न तु दृश्यते॥ २॥ टीका॥
येथून दृग दृश्यांचें विवरण करिजेतें॥ रूप जें जें दिसलें त्यास रूप म्हणावें। त्या रूपा
स दृश्य म्हणावें॥ त्याचा पाहाणार जो लोचन। त्यास द्रष्टा म्हणावें। लोचन द्रष्टा
जो त्यास दृश्यत्व जाणून। त्या लोचनातें पाहाणार जें मन तें द्रष्टा जाणावें॥ त्या म
नास दृश्यत्व स्थापून त्या मनाचा जो द्रष्टा साक्षी त्यास द्रष्टत्व जाणावें। दृश्यास
व दृग हें ही नाम तो साक्षी द्रष्टा न होय। तो कांहीं दृश्य नव्हे तो सर्वांचा जाणता स्व
रूप न त्याहून जाणता दुसरा कोणी नाहीं। तोच आत्मा ब्रह्म॥ हे जें बोलिलें श्लोक
व्याख्यान याचा विस्तार कीं दृश्यास नाना नाव लक्षणून अनात्मा जाणावें॥ दृश्यास
येक लक्षणून जाणा बयाचा निवाडा श्लोकें करून बोलिजेतो॥ श्लोक॥ नील

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai — Joint project

(३)

वा·सु· २ पीतस्थूलसूक्ष्मं ह्रस्वदीर्घादिभेदतः ॥ नानाविधानिरूपाणि पश्येल्लोचनमे
कधा ॥ २ ॥ टीका ॥ दृश्याचें भेद लक्षण तें हें असे ॥ निळें पिवळें आरक्त दवळें
शामपीतांश जें जे वर्ण तेसेंच स्थूल सूक्ष्म ह्रस्व दीर्घ आकाराचे जे जे भेद अ
से जे जे देखुण्यांत येते त्या सर्वही रूपातें अनेका पदार्थातें येकरूप लोचन
जे तें पाहातें ॥ श्लोक ॥ आंध्यमांद्यपदृत्वेषु नेत्रधर्मेषु चैकधा ॥ तें कल्पयेन्म सं
नः श्रोत्रत्वगादौ योज्यतामिदं ॥ ७ ॥ टीका ॥ तें दृश्य पाहाणार जें लोचन त्या
लोचनाचें नानात्व तें जैसें कीं अंधता आणि मंदता आणि प्रकाशता ऐसें ने
त्राचे अनेक धर्म ॥ जें त्यातें पाहाणार मन जें तें त्याचा द्रष्टा लक्षणावें ॥ जैसें ने
त्राचें लक्षण करून द्रष्टा मनास सिद्ध केलें या प्रकारें श्रोत्रही जाणावे ॥ ·सां·व·
जेही लक्षणा बोलु ॥ शब्दमात्र संस्कृत महाराष्ट्र तेलंग सर्वही देशभाषा ॥ २

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(3A)

आणि त्याभाषेचेंही भेद निंदा स्तुति गायन रोदन व्यवहारिक परमार्थिक पै
शून्य कुशब्द सुशब्द हे द्रश्य होय याचा द्रष्टा तो श्रवण होय त्या श्रवणाचें
जें अनेकत्व बधिरता मंदता दूरश्रवणता ऐशा नानाविध लक्षणास द्रश्य जा
णून मन तें येकविध द्रष्टा जाणावें॥ याप्रकारेंच जिव्हेचे रस जे जे कडु गोड ति
खट आंबट अनेक प्रकाराचे भेद जे त्यास द्रश्यत्व जाणून त्याचा द्रष्टा जे तें पै
कली जिव्हा जाणावी॥ आतां ते जिव्हा जे तीचे रोग मुक्के अनेकत्व जे त्याचा द्रष्टा
मन जें यास द्रग ऐसें म्हणावें याप्रकारेंच त्वचेचे जे जे स्पर्श मृदु कठिण सीत ऊष्मा
स ऐसे अनेकत्व स्पर्श जे याचा जाणता त्वगे त्यास द्रष्टा म्हणावें त्या त्वचेचे बाध
र्म जे अनेक त्याते मन येकलें द्रष्टे होय असें च परिमळ कस्तूरी अगरजा गुलाब मो
गरे जाई समंधि परिमळ आणि दुर्गंधी ही अनेकविध यास द्रश्य जाणून या

(4)

बा·का·सु·

च्या द्रष्टा नासिक तें येकविध जाणावे ॥ त्या नासिकाचे मंद स्फूर्ति रूप लक्षण जें त्याचा
जाणता मन जें त्यास द्रष्टा ह्मणावें। ऐसें पंचज्ञानेंद्रियांचे विषय हे दृश्य ते जाणून ज्ञाने
द्रिय द्रष्टा जाणून त्या दृश्या ज्ञानेंद्रियांतें दृश्य जाणून मनास द्रष्टत्व जाणावें आतां
त्या मनास दृश्यत्व ज्ञास्यापून त्याचा द्रष्टा जो त्या साक्षी स आत्मा ह्मणावे ॥ श्लोक ॥
कामसंकल्पसंदेहोश्रद्धाश्रद्धे धृतीतरे। ह्रीधीर्भीरित्येवमादीन्भासयत्येकधा
चितिः ॥ ५ ॥ टीका ॥ मनाचे धर्म जे ते ऐसे काम आणि संकल्प संदेह आणि श्रद्धा आ
णि अश्रद्धा धैर्य लज्जा बुद्धि भय ऐसे अनेक त्व मनाचे जें त्यास पाहाणार साक्षि जो
तो येक रूप होय ॥ श्लोक ॥ नोदेति नास्तमायाति न वृद्धिं याति न क्षयं ॥ स्वयं वि
भात्यथान्यानि भासयेत्साधनं विना ॥ ६ ॥ टीका ॥ तें मनाचे साक्षि चैतन्य जें तें उद
यातें पावत नाही अस्तातें पावत नाही वृद्धीतें पावत नाही क्षय ही त्यास नाही ऐसे हे स्व ग ·सां·ब·
रूप आत्मा जो साक्षि तो स्वयें भासत असतां आणखी जे दृश्य मात्र जें ति तयांस भास

John project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(4A)

वितें आणि आपण स्वयंप्रभ होय ऐसें स्वयंप्रकाश असुनि दुसरे प्रकाशा वया साधनांत
रांचि अपेक्षा नाहीं ॥ असें साक्षी चैतन्य परब्रह्म जेनें च बुद्धीचा ठाईं प्रतिबिंबलें ॥ श्लोक ॥
चिछायावेशतो बुद्धौ भानं धीस्तु द्विधा मता ॥ एकाहंकृतिरन्यास्यादंतःकरणरूपिणी ॥
॥ ६ ॥ टीका ॥ चैतन्य ब्रह्म जें तें बुद्धीचे ठाईं प्रतिबिंबलें ॥ ऐशी जे बुद्धी ते दोप्रकार येक बुद्धि
भागास अहंकार ह्मणावें दुसऱ्या बुद्धीच्या भागास अंतःकरण ह्मणावें ॥ श्लोक ॥
छायाहंकारयोरैक्यं तप्तायःपिंडवन्मतं ॥ तदहंकारतादात्म्याद्देहश्चेतनतामियात् ॥ ७ ॥
टीका ॥ तो अहंकार जो त्याचे ठाईं प्रतिबिंबलें जें चैतन्य तास्या दोघांशी ऐक्य जेंतें ताप
ल्या लोखंडाचे गोळ्या सारिखें जालें तोचि दाभासा स्वहित अहंकार जो तो देहाशि
मिळाला असतां जड जें देह तें चैतन्यसा लें ॥ श्लोक ॥ अहंकारस्य तादात्म्यं चिछाया
देहसाक्षिभिः ॥ सहजं कर्मजं भ्रांतिजन्यं त्रिविधं क्रमात् ॥ ८ ॥ टीका ॥ त्या अहंकाराचें
तादात्म्य जें तें चिछायेशी देहाशी आन साक्षीशी ॥ ऐसें तिघांशी अहंकार तादात्म्य

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

स्मरणावें। देहाशीं अहंकाराचें जें तादात्म्य स्मरणावें तें कर्मजन्य ॥ आणि चिछाये
शीं अहंकाराचें तादात्म्य जें तें सहजन्य स्मरणावें॥ साक्षीशी अहंकाराचे तादात्म्य
जें तें भ्रांतिजन्य स्मरणावें॥ श्लोक ॥ संबंधिनोः सतोर्नास्ति निवृत्तिः सहजस्य तु ॥ क
र्मक्षयात्प्रबोधाच्च निवर्त्तेते क्रमादुभे ॥ ७ ॥ टीका ॥ या तादात्म्याच्या निवृत्तीचा
प्रकार बोलिजेतो ॥ जो वरि चिदाभास अहंकार एकरूपें आहे त दोघांचा संबंध जो
वर आहे तोवर सहज तादात्म्य चिदाभासाशी त्याची निवृत्ति नाहीं ॥ ते प्रारब्ध
कर्मक्षयीं दोघेही नाश पावतील ॥ आणि देहाशी जें तादात्म्य अहंकाराचें तें कर्म
क्षय झाला असतां सुटलें ॥ नित्य जागृति कर्माचा क्षय झाला असता जें अहंकाराचें
तादात्म्य सुटोन देह निश्चळ पडतो तें देहाचें कर्मज तादात्म्य स्मरणावें ॥ आणि सा
क्षीशी तादात्म्य अहंकाराचे जें तें भ्रांतिजन्य होय ॥ तें तर जें ह्मां ज्ञान अपरोक्ष हो

ईलतेव्हां भ्रांतिजन्यतादात्म्यनाशपावेलं॥ भ्रांतिजन्यगेलें म्हणजे सर्व देहआणिअहंकार मिथ्यात्वें दग्धपटन्यायें करून असताहेतन॥ श्लोक॥ अहंकारलयोसुप्तौभवेद्देहोप्यचेतनः॥ अहंकृतिविकाशोर्धस्वप्नःसर्वस्तुजागरः॥१०॥ टीका॥ झोपेचेठाईं अहंकाराचालयझाल्याअसतांदेहजोअचेतनहोतो॥ आणिअहंकाराचाविकारजाहालाम्हणिजे स्वप्नआणिजागरणअवस्थाहोते॥११॥ श्लोक॥ अंतःकरणवृत्तिश्चचिच्छायैक्यत्वमागता॥ वासनाःकल्पयेत्स्वप्ने बोधेतु विषयान्बहिः॥१२॥ टीका अंतःकरणाचीवृत्तिज्यावृत्तीचेठाईंआत्म्याचेंप्रतिबिंबपडलें॥ म्हणजेवृत्तीचेठाईंज्ञानजें तोचिदाभासम्हणावें॥ ऐशी चिदाभाससहितवृत्ती

(८)

वा. सु. ५

जेतेस्वप्नाच्याठांईवासनाकल्पितेआणिजाग्रतकाळींइंद्रियेंकरूनबाहिर्वि
षयातेहीकल्पिते॥१३॥श्लोक॥मनोहंकृत्युपादानंलिंगमेवंजडात्मकं॥अव
स्थात्रयमन्वेतिजायतेम्रियतेपिवा॥१४॥टीका॥मनआणिअहंकारआहेउपादान
लिंगदेहाचेतेजडऐसेलिंगदेहअवस्थात्रयातेंअनुभवितेउत्पन्नहोत्येआणिम
रते॥श्लोक॥शक्तिद्वयंहिमायायाविक्षेपावृत्तिरूपकं॥विक्षेपशक्तिर्लिंगा
दिब्रह्मांडांतंजगत्सृजेत्॥१५॥टीका॥मायाजेलक्षणजेस्वरूपविस्मरणत्या
समायालक्षणाचेप्रकृतिलक्षणाचेअज्ञानलक्षणाचेतमलक्षणाचेसुषुप्तिलक्षणाचे
कारणलक्षणाचे॥अव्यक्तलक्षणाचे॥एशा॥आपल्यास्वरूपाचेअज्ञानोचीना
वेंतिलामायालक्षणाचे॥त्यामायेचादोनशक्तियेकविक्षेपशक्ति।दुसरीआव
रणशक्ति।विक्षेपशक्ति।तेजेशीलिंगादिकरूनब्रह्मांडपर्यंतजगनिर्माणक

सां. ब. ५

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(6A)

रितें ॥ दोन देह समष्टि आणि व्यष्टि हा सर्वही विक्षेप लक्षणाचा ॥ कर्तृत्व भोक्तृत्व हे
सर्व विक्षेपाचे लक्षण ॥ श्लोक ॥ सृष्टिर्नाम ब्रह्मरूपे सच्चिदानंदवस्तुनि ॥ अब्धौ
फेनादिवत्सर्वनामरूपप्रसारणं ॥ १४ ॥ टीका ॥ विक्षेपास सृष्टिही लक्षणावें ॥ सृष्टी
चें लक्षण तें ऐसें की ॥ सच्चिदानंदवस्तु जे ब्रह्म त्यांत नामरूप भासली उदकाचे फेसा
चे दृष्टांतांचे परियास सृष्टि लक्षणावी आतां दुसरी आवरणशक्तीचें लक्षण ॥ १५ ॥
श्लोक ॥ अंतर्दृग्दृश्ययोर्भेदं बहिश्च ब्रह्मसर्गयोः ॥ आवृणोत्यपरा शक्तिः सा सं
सारस्य कारणं ॥ टीका ॥ पूर्वव्याख्यानी दृग आणि दृश्य जें दाखविलें तें सर्वही दृ
श्य आत्मा जो द्रष्टा त्याहून वेगळें असोन तें वेगळेपणास आवरण घालून ऐ
क्यपणें भासतें ॥ आणि बाहेर ब्रह्म आणि सृष्टीचे वेगळेपणास जाणून ये

(७)

काक्यसु· ६

क्यत्व भासनेयाचे लक्षण स्पष्ट सांगू ॥ दृगदृश्याचे आवरण स्मणजे द्रष्टा न दिसून
दृश्य जे देहेंद्रियादिकाचे ठाईंच आत्मत्वबुद्धि आणि सत्यत्व हे प्रत्यगात्मविषईं आवर
ण ॥ आणि दुसरें तेंऐसें जे जगत्कारण ब्रह्म न दिसोन जगाचे सर्व भासावें । यासं आव
रणशक्ति स्मणावे हे संसारास कारण होय ॥ श्लोक ॥ साक्षिणः पुरतो भातं लिंग
देहन संयुतं ॥ चिछायायाः समावेशात् जीवस्याद्व्यावहारिकः ॥ ३६ ॥ टीका ॥ सा
क्षि जो प्रत्यगात्मा त्यासहे दोन्ही देह लिंगदेह आणि स्थूळदेह वेगळे पणें भासता
हेत ॥ या दोहीं चिदाभासाचे प्रतिबिंब आहे ऐसे देहद्वयासहित चिदाभासास व्य
वहारिक स्मणावें ॥ श्लोक ॥ तस्य जीवत्वमारोपात्साक्षिण्यप्यवभासते ॥ आवृ
तौ तु विनष्टायां भेदो भाति प्रयाति तत् ॥ ३७ ॥ टीका ॥ व्यवहारिक जीव देहद्वया
सहित जो स्मटला तें जीवत्व ते साक्षि जो प्रत्यगात्मा याचे ठाईं आरोपास्तव भासते

सा॰ ब॰ ६

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

वस्तुतासाक्षीचेठाईंदुर्दैचनाहींमगजीवत्वकैंचें ॥ तेंआवरणशक्तिजेतेंदृगदृश्य
विवेकज्ञानज्ञाल्यावरनाशापावलीअसतांसाक्षीचाआणिदृश्याचाभेदभास
तअसतांजीवपणाहीराहूंपावतनाहीं ॥ श्लोक ॥ तथासर्गब्रह्मणोश्वभेद
माघृत्यतिष्ठति ॥ याशक्तिस्तद्वशाद्ब्रह्मविकृतत्वेनभासते ॥ १८ ॥ टीका ॥ सृ
ष्टिआणिब्रह्मजेंयादोहींचेवेगळेपणासऐक्यरूपराहतेंजेआवरणशक्ति
तीकर्तींब्रह्मजेंतेंहीविकाररूपेंभासतें ॥ श्लोक ॥ तत्राप्यावृत्तिनाशेतुविभा
तिब्रह्मसर्गयोः ॥ भेदस्तयोर्विकारस्यात्सर्गेनब्रह्मणिक्वचित् ॥ १९ ॥ टीका ॥ ऐ
सेंविकाररूपभासलेंब्रह्मजामायेकर्तींतेमायाबोधेंनाशपावलीअसतांब्रह्मआणि
जगयादोहींचेवेगळेपणदिसतें ॥ त्यावेळेपणिपाहातांविकारजोआहेतोतरसृष्टी
चेठाईं । ब्रह्मींतिळमात्रनाहीं । आतांजगआणिब्रह्मयाचेंऐक्यआणिवेगळेपणबो

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule

(४)

वाक्यसु॰ ७

लिजे ॥ श्लोक ॥ अस्ति भाति प्रियं रूपं नाम चेत्यंशपंचकं ॥ आद्यत्रयं ब्रह्मरूपं जग
द्रूपं ततो द्वयं ॥ २० ॥ खंवाय्वग्निजलोर्वीषु देवतिर्यङ्नरादिषु ॥ अभिन्नाः सच्चि
दानंदाः भिद्येते रूपनामनी ॥ २१ ॥ त्रयेयएगते द्वये ग्रह्मं तेत्रयत्वेके रूपकं ॥ अंतः सर्व
चिदाकारं मायातीतं निरंजनं ॥ २२ ॥ टीका ॥ सत् आणि चित् आणि तिसरा आनंद या
सअस्ति भाति प्रिय हें ह्मणताव ऐसीं तिन्हीं आणि नाम आणि रूप ऐसे पाच अंश या पां
चाचे ठाईं तिन्ही पहिलीं ते परब्रह्मस्वरूप होत ऐसें जाणावें नाम आणि रूप जगास
म्हणावें तें नामरूपें कोठें आहेसम्हणाल तरि तेंही सांगू आणि ब्रह्मसही सांगू ॥ आकाश वा
यू अग्नि जल उर्वी पंचभूतें आणि भौतिकें जे देव तिर्यक् नर पशु आदि करून यांस
वीचे ठाईं सच्चिदानंद जे ते अभिन्न आहेत नामरूपें जे यांस च भेद आहे ॥ त्यास सच्चिदा
नंदास ही नामरूपात्मक ढेत जेंतें यामिळले ते तिन्ही येकरूपें करून नवर्तनाहेत त्या

सांब॰ ७

(8A)

स्तवसर्वहि चिदाकारसर्वहोय मायातीतनिरंजन होय ॥ श्लोक ॥ उपेक्ष्यनामरूपेद्वेसच्चि
दानंदतत्परः॥ समाधिंसर्वदाकुर्यान्हृदये वाथवा बहिः॥ २२॥ टीका॥ यास्तवनामें
आणिरूपें यादोहींचीउपेक्षाकरून सच्चिदानंदवस्तूचे ठाईं समाधि अखंड करीत जा
वी ते समाधि दोप्रकाराची आहे॥ श्लोक॥ सविकल्पोविकल्पश्च समाधिर्द्विविधो हृदि॥
दृश्यशब्दानुविद्धोयं सविकल्पः पुनर्द्विधा॥ २४॥ टीका॥ येक सविकल्प समाधि दुजि
ते निर्विकल्प समाधि ऐशा दोप्रकारा मध्ये सविकल्प समाधी जो तो दोप्रकारचा त्यां
त येक शब्दानुविद्ध आणि येक दृश्यानुविद्ध॥ श्लोक॥ कामाद्याश्चित्तगा दृश्यास्तत्सा
क्षित्वेन चेतनं॥ ध्यायन् दृश्यानुविद्धोयं समाधिः सविकल्पकः॥ २५॥ टीका॥ ॥
दृश्यानुविद्धाचें लक्षण कामसंकल्प श्रध्या अश्रध्या आदिकरून जे जे वृत्ती सउठ
लें चित्तगत सर्वही आपण जाणतो या सर्वा वृत्तीचा साक्षी तो कूटस्थ ब्रह्म मी होय॥

(९)

वाक्यसु ८

ऐसें ध्यान करावें ॥ यास सविकल्प दृश्यानुविद्ध समाधि म्हणावे ॥ श्लोक ॥ असंगः स
च्चिदानंदः स्वप्रभो द्वैतवर्जितः ॥ अस्मीति शब्दविद्धोयं समाधिः सविकल्पकः ॥ २६ ॥
टीका ॥ आतां शब्दानुविद्धाचें लक्षण ॥ मी असंग आहें सच्चिदानंद आहें स्व
यंप्रकाश आहें । द्वैतरहित आहें । ऐसें मुखें करून म्हणावें तो हा शब्दानुविद्ध सवि
कल्पसमाधि गला ॥ श्लोक ॥ स्वानुभूतिरसावेशात् दृश्यशब्दानुपेक्षितः ॥ निर्वि
कल्पः समाधिः स्यान्निर्वातःस्थितदीपवत् ॥ २७ ॥ टीका ॥ आतां निर्विकल्पस
माधीचे लक्षण ॥ आत्मानुभव जो त्या आनंदाचे आवेशें करून दृश्यानुविद्ध आ
णि शब्दानुविद्ध समाधि या दोंचीउपेक्षा निर्विकल्प होऊन राहाणें जे निर्वातस्थ
ळी दीपाचे परि ते निर्विकल्पसमाधी म्हणावी ॥ श्लोक ॥ हृदीव बाह्यदेशेपि
यस्मिन्कस्मिंश्च वस्तुनि ॥ समाधिराद्य सन्मात्रं नामरूपनिराकृतिः ॥ २८ ॥ टीका ॥

सोब ८

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(9A)

हृद्यावेठाईं अथवा बाह्यदेशावेठाईं जेजे वस्तु मात्र यावेठाईं सन्मात्रावें चिंतनक
रणें नामरूपवेगळीं करून हाये कसमाधी होय ॥ २९ ॥ श्लोक ॥ अखंडैकरसं वस्तु
सच्चिदानंदलक्षणं ॥ इत्यवछिन्नचिंतेयं समाधिर्मध्यमो भवेत् ॥ टीका ॥ अखंडए
करसवस्तु जे सच्चिदानंदलक्षण तें चिंतीत आवें तो समध्यमसमाधीलक्षणावें ॥ ३० ॥
श्लोक ॥ स्तब्धीभावो रसास्वादात्तृतीयः पूर्ववन्मत ॥ एतैः समाधिभिः षड्भिर्नयेत्का
लं निरंतरं ॥ ३१ ॥ टीका ॥ निर्विकल्परसाचेआस्वादनें करून स्तब्ध होणें हा पहिले
निर्विकल्पसमाधिरसास्वादसमाधि तिसरा होय ॥ ऐशा समाधी करून निरंतर का
ळ वेहरणा करावें ॥ समाधिरहित राहातां वृथा पशुवत् ॥ पामर जाणावा ॥ ऐसे जेजे
ब्रह्मनिष्ठ शुकादिक सनकादिक आणि ब्रह्मदेव तथा जनकादिक सनंदनादिक आ
णि जेजे सदैव समाधिमध्यें वराहाताहेत तेक्षणमात्र ते समाधिवाचून राहात नाहीत ऐ

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

वाक्यसु ९ सेअपरोक्षानुभूती मध्यें पाहिले निरोपिलेंअसे ॥ श्लोक ॥ देहाभिमाने गलिते
विज्ञाते परमात्मनि ॥ यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः ॥ २२ ॥ भिद्यते हृद
यग्रंथिछिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ २३ ॥
टीका ॥ परमात्मा देहातीत तो मी आहे ऐसें प्रत्यक्ष आत्मानुभव जाला असतां ॥
जेथे तेथे मन जातें तेथें तेथें समाधी होय ॥ हृदयग्रंथि म्हणिजे अहंकार नाश पा
वतो सर्व संशय छेदताहेत कर्में सर्व क्षयास पावताहेत जेव्हां परावर आत्मा मी
च ऐसें कळतें ॥ श्लोक ॥ अवछिन्नश्चिदाभासस्तृतीयः स्वप्नकल्पितः ॥ विज्ञेय
स्त्रिविधो जीवस्तत्राद्यः पारमार्थिकः ॥ २४ ॥ टीका ॥ तीं प्रकारचे जीव येक अव सांक ९
छिन्न दुजा चिदाभास तिजा स्वप्नकल्पित ॥ त्या तिघांमध्यें पहिला जो तो पारमार्थि

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(10A)

कहोय॥श्लोक॥अवछेदःकल्पितस्यादवछेघंतुवास्तवं॥तस्यजीवत्वमारोपाद्ब्र
ह्मत्वंतुस्वभावतः॥२५॥टीका॥पहिलाजोपारमार्थिकजीवसांटला॥त्याचेंअ
वछेदऐसेंनाव।त्याविशींनिर्णयऐसाकींतेंब्रह्मजेंतेंअवछेघहोयतेंसत्यआहे॥
आणितेथेंकल्पिलाजीवअवछिन्नतोखोटका॥तेंब्रह्मींआरोपास्तवतेथेंजीव
पणापाहतांतेंब्रह्मचहोय॥श्लोक॥अवछिन्नस्यजीवस्यतादात्म्यंब्रह्मणास
ह॥तत्वमस्यादिवाक्यानिजगुर्नतरजीवयोः॥२६॥टीका॥तोअवछिन्नयानावाचा
पारमार्थिकजीवजोत्याजीवाचेंतादात्म्यब्रह्मींशीहोय।सदेवमीब्रह्मआहेंऐसे
भावनेंकरूनस्वरूपींतादात्म्यकरूनअसतोत्यासचतत्वमसीमहावाक्यप्रमा
ण॥जेंशुद्धजीवत्यासगुरुमुखेंउपदेशझालाकींतूंब्रह्मआहेसत्यावाक्येंक
रूनब्रह्मींतादात्म्यहोतेंतेसेंइतरजीवजेहेदोघेस्वप्नकल्पितआणिप्रापंचिकया

वाक्यसु· १० वेंतादात्म्य ब्रह्मीनाही ॥ श्लोक ॥ ब्रह्मण्यपवस्थिता माया विक्षेपावृत्तिरूपिणी ॥
आवृत्याखंडितां तस्मिन् जगज्जीवेश्वकल्पिते ॥ २७ ॥ टीका ॥ ब्रह्म जें आत्मस्व श्री
रूप तेथे राहिलीजे माया ते विक्षेपकर्ती होय ॥ आवरणकर्ती होय या दोंल
क्षणाचा अर्थ तो पूर्व उक्त निरोपिला तो ऐसा कीं ब्रह्मीची अखंडता जे तिला आ
उ वरण घालून त्या अखंडतेचे ठाईं जीव ईश्वर आणि जग कल्पिलें ॥ श्लोक ॥
जीवो धीस्थचिदाभासो भवेद्भोगादिकर्मकृत् ॥ भोग्यरूपमिदं सर्वं जगत्स्या
द्भूतभौतिकं ॥ २८ ॥ टीका ॥ जीव जो बुद्धीचा ठाईं प्रतिबिंबला जो तो च भोग
आदि करून कर्मकर्ता होय त्या जीवास चहे सर्वही जगपंचभूतें आणि चोरखाणि
चीभौतिक शरीरें । त्याचे भोग्य होय ॥ चवदा भुवनाचे ठाईं चोरखाणीचीं शरी सांव· १०
रें धरून त्या चाकर्में करून तेथे तेथे जाऊन जगाचा भोग घेतो ॥ २९ ॥ श्लोक ॥

(TIA)

चिदाभासे स्थिता निद्रा विक्षेपावृत्तिरूपिणी॥आवृत्यजीवजागर्ति पूर्वतुल्ये केव
ल्पयेत्॥४०॥टीका॥चिदाभास जीव जो याचे ठाईं जे हे निद्रा त्यामाये सोरि रवी ते नि
द्रा विक्षेपकर्त्री आणि आवरणकर्त्री आवरणांचें लक्षण तें ऐसें की जीव आणि ज
गयास आवरण घालून नहें न दिसून देऊन जग दुसरें स्वप्न कल्पिल नवें चरचितें हें
सत्य जगत दिसून दे ऐसें हे आवरण आणि स्वप्न कल्पने हा विक्षेप॥श्लोक॥प्रती
तकाल एवैते स्थितत्वात्प्रातिभासिके॥नहि स्वप्नप्रबुद्धस्य पुनः स्वप्ने स्थितिस्त
योः॥४१॥टीका॥स्वप्नकाळीं स्वप्नगत भासते।जागलियानंतर नाहीं मग
स्वप्नीं राहाणें केंचें॥श्लोक॥प्रातिभासिकजीवो य [illegible] स्तज्जगत्प्रातिभासिकं॥
वास्तवं मन्यतेन्यस्तु मिथ्येती व्यावहारिकः॥४२॥टीका॥स्वप्नीं जो प्रातिभासिक
जीव जो त्याचें जें प्रातिभासिकस्थान जे भासमात्र ते।ते थोर वरें मानितो जो जीव परंतु

Joint project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(१२)

वा·सु· ११ व्यावहारिकजीवत्यालारूटकेमानितो॥श्लोक॥व्यावहारिकजीवोयस्तज्जग
व्यावहारिकं॥सत्यंप्रत्येतिमिथ्येतिमन्यतेपारमार्थिकः॥४३॥टीका॥व्यावहारि
कजीवजोतोयाव्यवहारजगातेंसत्यमानितोपरंतुपारमार्थिकजीवजोतोयाव्या
वहारिकासमिथ्यामानितोनिवृत्तपुरुषजेजेहीब्रह्मीऐक्यत्वकेलेंत्यासव्यावहारि
कजीवाच्याव्यवहारमिथ्याहोयव्यवहारिकजीवजगाचेठाईसत्तिनिमित्यस्त्रीध
नानिमित्यमहाघोरयत्नकरितातश्चमोहानानतेसर्वव्यवहारआपरमार्थिजीवा क
समिथ्या॥श्लोक॥पारमार्थिकजीवस्तुब्रह्मैक्यंपारमार्थिकं॥प्रत्येतिवीक्षतेना
न्यद्वीक्षतेत्वानृतात्मना॥४४॥टीका॥परमार्थिकजीवजोत्याचेब्रह्मीशीऐक्यहें
चखरेंमानूनआणखीकांहींआणिपाहतोजरहेंजगतरतेंमिथ्यत्वेंपाहातो॥ सांब
श्लोक॥माधुर्यद्रवशैत्यादिनरूधर्मातरंगके॥अंतुगेव्याप्यतिष्ठंतिफेनेप्यनु ११
पाहातनाहि।

(12 A)

गतांतथा॥७५॥टीका॥मधुरताद्रवपणशीतलताहे जल्याचे धर्म तरंगाचे ठा
ईजाउन राहातात हे तूं तेंच फेणाचे ठाईं जाउन राहातात हे तयादृष्टांतें साक्षीचे ठाईं
सच्चिदानंद जे आहेत ते देहावर पाहावे॥श्लोक॥साक्षिस्थाः सच्चिदानंदाः संबं
धाद्व्यावहारिके॥तद्वारेणानुगच्छंति तथैव प्रातिभासिके॥७६॥टीका॥सा
क्षिआत्मा जो याचा ठांईंच सच्चिदानंद जे ते संमंधे करून व्यावहारिकरून व्या
वहारिकजीवाचे ठाईं येताहेत त्या व्यावहारिकजीवाचे द्वारेंच प्रतिभासिकजीवा
चे ठांईं जाताहेत॥ते सच्चिदानंदाचे लक्षण काय म्हणाल तर सांगूं॥सद्रूप म्हणि
जे सर्वत्र सर्वकाळीं आहे। चिद्रूप म्हणिजे ज्ञान। स्वरूप आनंद म्हणजे आवडतें
ऐसें सदैव आहे ज्ञान आवडतें सच्चिदानंदरूप म्हणावें॥श्लोक॥लये फेनस्य त
द्धर्माः द्रवाद्याः स्युस्तरंगके॥तस्यैव विलये नीरे तिष्ठंत्येते यथा पुरा॥७७॥सा

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(13)

वाक्यसु·
१२

तिभासिकजीवस्यलयेस्फव्यावहारिके॥नष्टेये सच्चिदानंदाः पर्यवस्यंतिसाक्षि
णि॥४८॥टीका॥जैसेजलाचेधर्मद्रवशैत्यादिकफेनाचाठांई होतेतोफेसना
सलाअस्तांतरंगाचेठाईआऊनराहातातहेतत्यातरंगाचाही नाशझालाअस्तां
उदकाचेठांईचजैसेंपूर्वहोतेंतैसेचराहातातहेत॥यादृष्टांतेंकरूनस्वप्नामध्ये
प्रातिभासिकजीवतोत्याचेठाईसच्चिदानंदजेंहोतेंतेंप्रातिभासिकाचालयझा
लाअस्तांतेंसच्चिदानंदव्यवहारिकजीवाचेठाईराहाताहेतत्याव्यवहारिकजी
वाचालयझालाअस्तांसच्चिदानंदजेंतेंसाक्षीचेचठांईराहाताहेतअसेंअखंड
सच्चिदानंदस्वरूपप्रत्यगात्मासाक्षिजोआपणआपलेंस्वरूपऐसेंजाणावें॥
आणिदृश्यमात्रदृश्यइंद्रियेमनहेंसर्वमिथ्यांसाक्षीमनादिकाचाजोआपण
तोपूर्णब्रह्मजाणूनयाचेठाईसदैवसमाधियोगकरावा॥म्हणजेमनाचीविष

·सांव·
१२

(13A)

याकारताटाकूनब्रह्माकारताकरावी॥जरऐसेंनकेलेतरसाक्षीपणादृढजालें
नाहींह्मणूनविपरीतभावनाउठताहेतयाकरितांसर्ववृत्तीचालयउपरमकरूनब्र
ह्माकारवृत्तीकरावी॥ऐसादृगदृश्यविवेकऋषीश्वररूपाप्रसादेंयथामतिवर्णि
लाजगन्नाथेंतोजगदात्माऋषीश्वरीप्रीतिपावो॥श्लोक॥यद्गुनेबुद्धिनैश्च
ल्याज्जीवन्मुक्तिपदेस्थितिः॥काव्यपूर्वाजयतिसाऋषीश्वरपदेस्थिता॥१॥
तस्मादांवुरुहद्वंद्वध्यानधूतधियामया॥साऋताकारिदृग्दृश्यविवेकाभिघटी
कया॥२॥ यदत्रनोऋपूर्वस्यात्क्षम्यतांगुरुऐवनतः॥प्रियतामनयानित्यंसो
ऽयमज्ञाननतःसदा॥३॥इतीश्रीमच्छंकराचार्यविरचितेवाक्यसुधानामप्रकरणं
संपूर्णं॥टीकाजगंन्नाथकृतासंपूर्णमस्तु॥श्रीमदृषीश्वरार्पणमस्तु॥सांब॥

(14)

वा-सु
१२

स्तंभः स्विदोथरोमांचः स्वरभंगोथवेपथुः॥ वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौसात्विका
मताः॥१॥ इत्यष्टौसात्विकभावाः॥ स्तंभः॥ चित्रकांटाक्रा१ स्विदः घर्मकणि
का२ रोमांचः कंठकोद्गम ३ स्वरभेदः गद्गदस्वर ४ वेपथुः शरीरकंपा ५
वैवर्ण्य वर्णभेद। ६ अश्रु आनंदाश्रुप्रादुर्भाव ७ प्रलय जीवदशानाश ८॥
दृग्दृश्यौपदार्थौस्तः परस्परविलक्षणौ॥ दृग्ब्रह्मदृश्यमायेतिइतिवेदांतडिं
डिमा॥१॥ ७॥ इतिवाक्यसुधासमाप्त॥ सांब॥ ॥७॥ ७॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

सांब
१२

# मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com